| | |
|---|---|
| MHJN020011372023 | वि.दि.वा.क्र.२२१/२०२३<br>पांडुरंग सतकर–वि–विमल सुपारकर व ई |

**<u>निशाणी क्र.०५ वरील आदेश</u>**

**(<u>दि.२१.०७.२०२५ रोजी पारीत</u>)**

. वादी यांनी मौजे नागेवाडी,ता.जि.जालना येथील गट क्र.२२३ क्षेत्र.१२हे.८८आर पैकी ०३हे.६१आर जमीनीचा प्रतिवादी क्र.५ यांनी महसूल अभिलेखातील त्यांच्या नावाचा नोंदीचा गैरफायदा घेऊन त्रयस्थ व्यक्तीचे हितसंबंध निर्माण करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे अर्जातील कथन असे की,मौजे नागेवाडी,ता.जि.जालना येथील गट क्र.२२३ क्षेत्र.१२हे.८८आर पैकी ०३हे.६१आर जमिनीच्या चतुःसिमा खालीलप्रमाणे आहेत–

| | |
|---|---|
| पूर्वेस | –गट क्र.२२२ |
| पश्चिमेस | –या सर्वे नंबरमधील वादीचे भाऊ श्रीरंग मैनाजी सतकर यांनी खरेदी केलेली जमीन |
| दक्षिणेस | –गट क्र.२२४ भाग व एम.आय.डी.सी. |
| उत्तरेस | –गट क्र.२१२ |

(सदर जमिनीस यापुढे “वाद मिळकत” म्हणुन संबोधण्यात येईल.)

३. वादीचे पुढे असेही कथन आहे की,भू.सं.नि.क्र.६५/२००४ मधील

दि.१५.१२.२००९ रोजीचा न्यायनिर्णय हा मयत भरत कुंडलिकराव सुपारकर म्हणजे प्रतिवादी क्र.१ चे मयत पती आणि प्रतिवादी क्र.२ ते ४ चे मयत पिता यांनी धोकाधडीने खोटी पुरशिष व तडजोडीद्वारे न्यायालयाची दिशाभूल करुन पारित केलेला असल्यामुळे तो वादीवर बंधनकारक नाही,तसेच नि.दि.अ.क्र.३३ /२००२ मध्ये वादीने अपिल दाखल करण्यासाठी अथवा काढून घेण्यासाठी देखील स्वतः स्वाक्षरी केलेली नसून वादीच्या माघारी न्यायनिर्णय व हुकूमनामा पारित झालेला आहे,तसेच वादीने उप विभागीय अधिकारी तथा भू–संपादन अधिकारी,जालना यांच्याकडे दि.२७.०४.१९९५ रोजी कोणतेही शपथपत्र करुन दिलेले नसल्यामुळे ते वादीवर बंधनकारक नाही असे घोषीत करण्यासाठी प्रस्तुत दावा दाखल केलेला आहे. त्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी प्रतिवादी क्र.५ च्या हक्कात वाद मिळकतीसह मौजे नागेवाडी,ता.जि.जालना येथील गट क्र. २२४ मधील भावाच्या मिळकतीसह एकुण १२हे.८८आर.जमिनीचे विक्री–पत्र क्र. ४८८४/२०२० दि.०५.१२.२०२० रोजीचे नोंदणीकृत विक्री–पत्र वादीवर बंधनकार नसल्याने ते रद्द करण्यासह त्याचा ताबा मिळण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

४. वादीचे पुढे असेही कथन आहे की,वाद मिळकत मौजे नागेवाडी, ता.जि.जालना येथील गट क्र.२२३ च्या चूकीच्या नोंदीआधारे प्रतिवादी क्र.५ ने

कसल्याही प्रकारचे बांधकाम करु नये,तसेच प्रतिवादी क्र.५ च्या महसूल अभिलेखातील त्यांच्या नावाच्या नोंदीचा गैरफायदा घेऊ नये आणि गट नं.२२३ मधील वाद मिळकतीमध्ये त्रयस्त व्यक्तीचे हितसंबंध निर्माण करुन नये असा प्रतिवादी क्र.५ याच्या विरुध्द् शाश्वत मनाई हुकूम पारित करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. मौजे नागेवाडी,ता.जि.जालना येथील जुना सर्वे क्र. १०७ हा पूर्वी दत्तु किसनराव जाधव यांच्या,तर सर्वे नं.१०३ मधील जमीन ही किशनराव ईश्वरराव जाधव यांच्या मालकी व ताब्यात होता. वादीने स.नं.१०७ मधील ०३हे.६१आर. जमीन दत्तु किसनराव जाधव यांच्याकडून नोंदणीकृत खरेदी–खत क्र.१५५०/१९८१,दि.२२.०४.१९८१ रोजी रु.१६,०००/–मध्ये खरेदी केलेली आहे. मयत भरत कुंडलिकराव सुपारकर हे अज्ञान असताना त्यांच्या नावे वडील कुंडलिकराव गुणाजी सुपारकर यांनी मौजे नागेवाडी येथील स.नं.१०३ क्षेत्र.२२एकर२१गुंठे म्हणजे ९हे.१०आर. जमीन नोंदणीकृत खरेदी–खत क्र.५२४/१९७१ दि.२२.०२.१९७१ रोजी खरेदी केलेली आहे.

५. वादीचे पुढे असेही कथन आहे की,मौजे नागेवाडी,ता.जि.जालना येथील स.नं.१०७ चे एकत्रिकरण योजनेमध्ये गटात रुपांतर होऊन त्यांना गट क्र.२२३ झाला आणि स.नं.१०३ चे रुपांतरण गट क्र.२१९ मध्ये झाले. तसेच सर्वे नं.१०७ म्हणजे गट क्र.२२३ हा वादी व त्याच्या भावाच्या नावाने तयार

झाला. सर्वे नं.१०३ हा पूर्वी भरत कुंडलिकराव सुपारकर यांचा होता व रुपांतरण झाल्यानंतर गट क्र.२१९ त्यांच्या नावे झाला. मौजे नागेवाडी गावामध्ये सन १९८३–८४ साली एकत्रिकरण योजना अंमलात आल्यानंतर गट क्र.२२३ मधील जमीन वादी व त्यांचे भाऊ यांच्या ताब्यात मालक नात्याने राहीली.

६. वादीचे पुढे असेही कथन आहे की,१५ वर्षानंतर म्हणजे सन २४.०५.१९९९ रोजी भरत कुंडलिकराव सुपारकर यांनी अधिक्षक भूमि अभिलेख,जालना यांच्याकडे गट क्र.२१९ व २२३ मधील जमिनी त्यांच्या वडीलोपार्जीत असल्याबाबत एक खोटा अर्ज दाखल केला होता. गट नं.२२३ हा त्यांच्या ताब्यात आहे,परंतु दत्तु किसनराव,वादी आणि त्यांचे भाऊ यांच्या नावाचा अंमल आहे. गट नं.२१९ मधील जमीन अतिरीक्त एम.आय.डी.सी.,जालना यांनी संपादित केली असून ती प्रतिवादी क्र.१ चे मयत पती आणि प्रतिवादी क्र.२ ते ४ चे मयत पिता नामे भरत कुंडलिकराव सुपारकर यांच्या नावे होती. मात्र त्यांनी त्यांच्या नावाचा चुकीचा अंमल गट क्र.२१९ च्या अभिलेखात झाला असून ते गट नं.२२३ चे मालक आहे व दत्तु किसनराव,वादी व त्यांचे भाऊ हे मौजे नागेवाडी येथील गट नं.२१९ चे मालक आहेत. परंतु त्यांचे नाव नजरचूकीने गट नं.२२३ च्या अभिलेखात लागले आहे. त्यामुळे सदर चूक दुरुस्त करावी अशी विनंती केली होती.

७. वादीचे पुढे असेही कथन आहे की,गट नं.२२३ च्या अभिलेखात भरत कुंडलिकराव सुपारकर यांच्या नावाचा व ताब्याचा अंमल घेऊन दत्त किसनराव,वादी व त्यांच्या भावांच्या नावाचा अंमल गट क्र.२१९ मध्ये घेण्यात यावा म्हणजे गट क्र.२१९ हा त्यांच्या नावावरुन कमी होऊन तो वादी व त्यांचे भावांच्या नावे करावा आणि गट नं.२२३ मधील वादी व त्यांच्या भावांची नावे कमी करुन तो गट भरत कुंडलिकराव सुपारकर यांच्या नावे करावा. याबाबत दोन्ही गटाच्या मालकांनी उप विभागीय अधिकारी,जालना यांच्याकडे तशी अदलाबदल करण्याबाबत शपथपत्र लिहून दिले असे कथन करुन वादीच्या माघारी वादी व त्यांच्या भावाचे सहया असलेले खोटे शपथपत्र दाखल केले,जे की त्यांनी कधीही करुन दिलेले नाही व तसा त्यांना कोणताही अधिकार नाही.

८. वादीचे पुढे असेही कथन आहे की,वादी व त्यांचे भाऊ हे मौजे नागेवाडी येथील गट नं.२२३ मधील जमीनीचे खरेदी आधारे मालक व काबीज झालेले आहे,कारण त्यांनी सदर जमीन दत्तु किसनराव जाधव यांच्याकडून नोंदणीकृत खरेदी–खत क्र.१५५०/१९८१, १५५१/१९८१, १५५२/१९८१ व १६४२/१९८२ नुसार मालक व काबीज झाले. मयत भरत कुंडलिकराव सुपारकर यांचे वडीलांनी भरतराव सुपारकर हे अज्ञात असताना त्यांच्या नावे गट नं.२१९ मधील जमीन नोंदणीकृत खरेदी–खत क्र.५२४/१९७१ आधारे खरेदी

केली. त्यामुळे या दोन्ही गटामध्ये नजरचूकीने अंमल होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

९. वादीचे पुढे असेही कथन आहे की,भरत कुंडलिकराव सुपारकर यांच्या खोटया अर्जानुसार गट नं.२२३ हा त्यांच्या नावे करण्यात यावा आणि गट नं.२१९ हा दत्तु किसनराव व वादी व त्यांचे भाऊ यांच्या नावे करण्यात यावा असा आदेश अधिक्षक,भूमि अभिलेख,जालना यांना अधिकार नसताना त्यांनी दि.२१.११.१९९९ रोजी आदेश पारित केला. त्यानंतर वादी व त्यांचे भाऊ यांनी सदर न्यायनिर्णयाविरुध्द् उप संचालक भूमि अभिलेख,औरंगाबाद यांच्याकडे अपिल क्र.५६०/२००१ दाखल केले असता ते दि.२९.०१.२००४ रोजी मंजूर करण्यात आले. त्यानुसार गट नं.२२३ च्या अभिलेखात पुन्हा वादी व त्यांचे भाऊ यांच्या नावाचा अंमल मालक व कब्जेदार म्हणुन दि.०२.०८.२००४ रोजी फेर क्र.८६० प्रमाणे नोंदविण्यात आला.

१०. वादीचे पुढे असेही कथन आहे की,मयत भरत कुंडलिकराव सुपारकर यांची गट क्र.२१९ मधील जमीन अतिरीक्त औद्योगिक वसाहतीसाठी संपादित झाल्याने नुकसान भरपाईचा धनादेश क्र.३२७६८२,रु.९,२३,२०५/– रक्कम संबंधित कार्यालयात पाठविण्यात आली. सदरची बाब मयत भरत सुपारकर यांनी अधिक्षक,भूमि अभिलेख,जालना यांच्याकडे अर्ज करताना लपवून ठेवली.

११. वादीचे पुढे असेही कथन आहे की,प्रतिवादी क्र.१ ते ४ अथवा मयत भरत कुंडलिकराव सुपारकर यांचा गट क्र.२२३ मधील वादीच्या जमिनीशी कुठलाही संबंध नसताना त्यांनी नि.दि.वा.क्र.१०९/२०१२ हा वादी व त्याच्या भावा विरुध्द् दाखल केला व तो सन–२००२ साली फेटाळण्यात आला. त्यानंतर तहसिलदार,जालना यांनी दि.२४.०४.२०१२ रोजी वादी अथवा त्यांचे भाऊ यांना कुठलीही पूर्व सूचना न देता सदर निर्णयाद्वारे पुन्हा भरत कुंडलिकराव सुपारकर यांच्या नावाचा अंमल अभिलेखात घेण्याबाबत बेकायदेशीर आदेश दिल्यामुळे त्यांचा नावाचा अंमल गट नं.२२३ च्या अभिलेखात फेरफार क्र. १९१४ नुसार करण्यात आला व वादी व त्यांच्या भावाच्या नावाचा अंमल गट नं.२२३ मधून वगळण्यात आला.

१२. वादीचे पुढे असेही कथन आहे की,तहसिलदार,जालना यांना कोणताही आदेश पारित करण्यासाठी नि.दि.वा.क्र.१०९/२००० मध्ये मा.दिवाणी न्यायाधीश,जालना यांनी आदेश पारित केलेले नाही. त्यामुळे वादीचे नाव गट नं.२२३ मधून बेकायदेशिररित्या कमी केल्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ४ हे त्यांच्या नावे असलेला गट नं.२२३ वरील अंमल/नोंदीचा गैरफायदा घेऊन वादीला त्यांच्या हिश्याच्या ३हे.६१आर जमिनीतून बेदखल करण्याचा प्रयत्न करीत आहे. तसेच प्रतिवादी हे वाद मिळकत हस्तांतरीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. तसेच

प्रतिवादी वादीस जमिनीचे स्वरुप बदलण्याचा आणि त्यावर बोजा निर्माण करण्याच्या धमक्या देत आहेत. वादीने वाद मिळकतीची कागदपत्रे बघितली असता फेर क्र.१९९४ अन्वये पुन्हा पुढे फेर क्र.२१९२ व २२९९ हे मंजूर केल्याचे कळाले. त्यामुळे वादीने वरील तीनही फेर विरुध्द् विलंब क्षमापणाच्या अर्जासह उप विभागीय अधिकारी,जालना यांच्याकडे आरओआर अपिल क्र.२०२१/ आरओआर/सीआर–१३६ हे अपिल दाखल केले. त्यामध्ये दि.०३.०३.२०२२ रोजी विलंब क्षमापित न करता अपिल फेटाळण्यात आले.

१३. वादीचे पुढे असेही कथन आहे की,त्यांनी उप विभागीय अधिकारी, जालना यांनी दि.०३.०३.२०२२ रोजी नामंजूर केलेल्या अपिल विरुध्द् अप्पर जिल्हाधिकारी,जालना यांचे न्यायालयात दुसरे आरओआर अपिल क्र.२०२२/ आरबी/अपिल/सीआर–४९ दाखल केले. परंतु सदर अपिल देखील दि. २३.०८.२०२२ रोजी फेटाळण्यात आले. त्यापूर्वी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी बेकायदेशीरपणे वाद मिळकत प्रतिवादी क्र.५ यांना नोंदणीकृत विक्री–पत्र क्र. ४८८४/२०२० दि.०५.१२.२०२० रोजी विक्री केली. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा केला. कारण वाद मिळकत स.नं.१०७ गट नं.२२३ मधील जमीन वादीने नोंदणीकृत खरेदी–खताआधारे विकत घेतलेली असून ती मयत भरत कुंडलिकराव सुपारकर यांना किंवा त्यांच्या वारसांना हस्तांतरीत केली नाही

अथवा त्यांच्याशी कधीही तडजोड केली नाही.

१४. वादीचे पुढे असेही कथन आहे की,त्यानंतर वादीने अप्पर जिल्हाधिकारी,जालना यांचे दि.२३.०८.२०२२ रोजीच्या निर्णयाविरुध्द् मा. अप्पर आयुक्त,औरंगाबाद येथे रिव्हीजन अर्ज क्र.४३७/२०२२ अन्वये अपिल दाखल केलेले असून ते न्यायप्रविष्ठ आहे. मयत कुंडलिकराव सुपारकर यांनी वादीची फसवणूक करुन व कुठलाही दस्त किंवा तडजोड केलेली नसताना नि.दि.वा.क्र.१०९/२००० व नि.दि.अ.क्र.३३/२००२,भू.सं.नि.क्र.६५/२००४ अन्वये दाखल केलेले नसताना त्या वादीने दाखल केल्याचे खोटे भासवून व न्यायालयाची फसवणूक करुन खोटे आदेश प्राप्त केले. त्यानुसार मौजे नागेवाडी येथील गट नं.२२३ मधील वादीच्या मालकी व ताब्याची ०३हे.६१आर.जमिनी–बाबत स्वतःच्या नावाचा त्यांच्या माघारी फेर क्र.१९१४ हा कुठलीही नोटीस न देता बेकायदेशीर अंमल केला. त्यानंतर फेर क्र.२१९२ नुसार प्रतिवादींनी स्वतःच्या नावे वारसाआधारे करुन घेतली आणि प्रतिवादी क्र.५ यांना वाद मिळकत व वादीच्या भावांची अशी १२हे.८८आर.जमीन रु.३,४०,००,०००/– मध्ये विक्री केली. त्यामुळे वादीस दि.३१.०३.२०२२ रोजी प्रस्तुतचा दावा दाखल करण्यास कारण घडले. करीता वादीच्या हक्कात तुर्तातूर्त मनाई हुकूम पारित करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

१५. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी नि.क्र.१३ अन्वये त्यांचा लेखीजबाब दाखल केला व वादीच्या अर्जातील संपूर्ण कथने नाकारली. त्यांनी त्यांच्या अतिरीक्त लेखीजबाबात असे कथन केले की,वादीचा दावा कायदेशिरदृष्ट्या समर्थनीय नाही. वादीला प्रतिवादी विरुध्द् दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही व कोणताही अधिकार नाही. त्यामुळे वादीचा दावा व अंतरिम मनाई हुकूमाचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा. तसेच वादीने दाव्यासोबत आवश्यक ते न्यायालयीन शुल्क दिलेले नाही. वादीने विक्री–पत्र क्र.४८८४/२०२० दि. ०५.१२.२०२० रद्द करुन मागितले आहे व दाव्यातील परिच्छेद क्र.१० मध्ये वाद मिळकतीचे मूल्य रु.३,४०,००,०००/–असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार वादीने मूल्यांकनावर मुंबई कोर्ट फिस ॲक्ट नुसार रु.३,००,०००/– कोर्ट फिस दाव्यासोबत दिलेली नसून अपुरे न्यायालयीन शुल्क दिलेले आहे. सदर कारणामुळे वादीचा दावा खर्चासह फेटाळण्यात यावा.

१६. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की,गट नं.२२३ मधील जी मिळकत समाविष्ट केलेली आहे ती महाराष्ट्र जमीन महसूल संहित,१९६६,कलम ४२(ब) प्रमाणे जा.क्र.२०२२/जमा–२/सीआर–११६ नुसार तहसिलदार यांनी दि.२५.०५.२०२२ रोजी प्रतिवादी क्र.५ यांना अकृषिक वापराची परवानगी दिलेली आहे. त्या अनुषंगाने शासनाने प्रतिवादी क्र.५ कडून अकृषिक प्रयोजनार्थ

कर आकारणीची रक्कम रु.१३,३०,४१६/–चलनाद्वारे भरणा केलेली आहे. तसेच वादीने मा.अप्पर आयुक्त,औरंगाबाद येथे रिव्हीजन अर्ज क्र.४३७/२०२२ हे प्रकरण प्रलंबीत असल्याचे जे कथन केले आहे ते चूकीचे व खोटे आहे. सदर प्रकरण दि.०५.०७.२०२३ रोजी निकाली निघालेले आहे.

१७. प्रतिवादीचे पुढे असेही कथन आहे की,वादी,त्यांचे भाऊ श्रीरंग मैनाजी सतकर,बन्सीलाल मैनाजी सतकर,रामेश्वर मैनाजी सतकर यांनी उप विभागीय अधिकारी,जालना यांच्याकडे नागेवाडी येथील जमीन शासनाने संपादीत केली,तेव्हा आक्षेप अर्ज दाखल केले होते. सदर आक्षेप अर्जावर संबंधीत अधिकारी यांनी आक्षेपकर्ता यांनी योग्य त्या न्यायालयात रुजू होऊन झालेल्या चूकीची दुरुस्ती करुन सुधारित अभिलेख सादर करावे असा शेरा नमूद केलेला आहे. सदरील एका आक्षेपामध्ये नमूद जमीन गट नं०२१९ हा वादी आणि गट नं.२२३ हा भरत कुंडलिक यांच्या ताब्यात आहेत. तसेच दुस–या आक्षेप अर्जानुसार वादी व त्यांचे भाऊ यांनी मुळ मालक दत्तात्रय जाधव यांच्याकडून जमीन विकत घेतलेली आहे,परंतु त्यातील चतुःसिमा बरोबर असून सर्वे नंबर चूकीचे असल्याचे नमूद केलेले आहे. त्यामुळे वादीच्या दाव्याला लॉ ऑफ इस्टॉपल मधील तत्वाची बाधा येते.

१८. प्रतिवादीचे पुढे असेही कथन आहे की,मौजे नागेवाडी येथील गट

नं.२१९ मधील जमीन एम.आय.डी.सी.साठी संपादीत झाली,त्यावेळी आक्षेप नोंदवण्यात आले होते. सदर आक्षेप अर्ज दाखल झाल्यामुळे भू–संपादन अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी यांनी दि.१२.०३.२००४ रोजी मा. जिल्हा न्यायालय,जालना येथे भू.सं.नि.क्र.६५/२००४ अन्वये दाखल केले. सदर प्रकरणात वादी आणि त्यांच्या भाऊ यांच्यामध्ये नि.क्र.१४ प्रमाणे तडजोड होऊन गट नं.२१९ मधील मावेजाची रक्कम वादी व त्यांच्या भावांना देण्याबाबत नमूद केले. तसेच असेही नमूद केले होते की,गट नं.२२३ मधील जमिनीचे प्रतिवादी क्र.१ हे मालक व ताबेदार असल्याने मान्य केल्यामुळे संपादीत जमीनीशी वादी व त्यांचे भाऊ यांचा कोणताही हक्कसंबंध राहणार नाही.

१९. प्रतिवादीचे पुढे असेही कथन आहे की,भू.सं.नि.क्र.६५/२००४ मध्ये दि.१५.१२.२००९ रोजी न्यायनिर्णय पारित झालेला असून त्याचे विरुध्द् वादी अथवा त्यांच्या भावांनी कोणतेही अपिल दाखल केलेले नाही. तसेच वादी यांनी नि.दि.वा.क्र.१०९/२००० हा घोषणा व मनाई हुकूमाचा दावा दाखल केला होता,तो दि.०७.०२.२००२ रोजी फेटाळण्यात आला. त्या अनुषंगाने वादीने नि. दि.अ.क्र.३३/२००२ अपिल दाखल केले होते व त्यामध्ये दि.१४.०२.२००६ रोजी पुरशिष दाखल करुन अपिल काढून टाकण्याबाबत कळविले होते. त्यामुळे वादीचा प्रस्तुत दावा मुदतबाहय असल्याचे सिध्द् होते.

२०. प्रतिवादीचे पुढे असेही कथन आहे की,वादी व त्यांच्या भावांनी उप संचालक भूमि अभिलेख,औरंगाबाद येथे प्रकरण दाखल केले होते व त्यामध्ये हजर राहून गट नंबर बदलण्याबाबत संमती जबाब दिलेला आहे. तसेच वादी व त्यांचे भाऊ हे गट नं.२१९ आणि भरत कुंडलिक सुपारकर हे गट नं.२२३ चे मालक व ताबेदार असल्याचे मान्य केलेले आहे. त्यानुसार प्रतिवादी क्र.१ ते ४ हे वारसाहक्काने भरत कुंडलिक सुपारकर यांच्या मृत्यूनंतर गट नं.२२३ चे कायदेशीर मालक व ताबेदार आहेत व त्यांनी आर्थिक अडचणीमुळे संपूर्ण जमीन प्रतिवादी क्र.५–गणपती रिरोल्स प्रा.लि. यांच्याकडून रु.३,४०,००,०००/–घेऊन कायमस्वरुपी विक्री–पत्र क्र.४८८४/२०२० दि.०५.१२.२०२० अन्वये विक्री केलेली आहे. सदर जमीनीच्या चतुःसिमा लेखीजबाबातील परिच्छेद क्र.४५ मध्ये नमूद केलेल्या आहेत. परंतु वादीने सदर दाव्यामध्ये आवश्यक असलेल्या व्यक्तीना पक्षकार म्हणुन समाविष्ट केलेले नाही. करीता वादीचा दावा आणि अंतरिम मनाई हुकूम अर्ज खर्च रक्कम रु.३,०००/–सह फेटाळण्यात यावा.

२१. अभिलेखावरील दस्तऐवज आणि लेखीजबाबाचे अवलोकन केले.

२२. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद श्रवण.

२३. अभिलेखावरील कागदोपत्री पुराव्यावरुन अर्जाच्या पुष्ठयर्थ खालील मुद्दे विचारात घेण्यात आलेले असून त्यावरील निष्कर्ष व कारणे पुढीलप्रमाणे

नोंदविलेले आहे –

| अक्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी यांनी प्रथमदर्शनी त्यांची बाजू सिध्द् केली आहे काय ? | **अंशतः होकारार्थी** |
| २. | सोयीचे संतूलन वादी यांच्या बाजूने आहे काय ? | **अंशतः होकारार्थी** |
| ३. | वादी सिध्द् करतात काय की,सदर अर्ज नामंजूर केल्यास त्यांचे अपरिमीत असे नूकसान होईल ? | **अंशतः होकारार्थी** |
| ४. | अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते ४ बाबत–**

२४. अभिलेखावर उपलब्ध सर्व दस्तऐवजांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे दिसून येते की,वादी यांनी मौजे नागेवाडी,ता.जि.जालना येथील गट क्र.२२३ क्षेत्र.१२हे.८८आर.पैकी ०३हे.६१आर.जमीनीचा ताबा घोषीत करणे भू.सं.नि.क्र.६५/२००४ मधील दि.१५.१२.२००९ रोजीचा न्यायनिर्णय, तसेच नि.दि.वा.क्र.१०९/२००० व नि.दि.अ.क्र.३३/२००२ या प्रकरणांमधील न्यायनिर्णय आणि हुकूमनामा वादीवर बंधनकारक नसल्याची घोषणा करुन मिळण्यासाठी दावा दाखल केलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी प्रतिवादी क्र.५ यांच्या हक्कात दि.०५.१२.२०२० रोजी करुन दिलेले नोंदणीकृत

विक्री–पत्र क्र.४८८४/२०२० वादीवर बंधनकारक नसल्याची घोषणा करुन मिळण्यासह प्रतिवादी क्र.५ यांनी महसूल अभिलेखातील त्यांच्या नावाचा नोंदीचा गैरफायदा घेऊन त्रयस्थ व्यक्तीचे हितसंबंध निर्माण करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२५. वादीच्या कथनानुसार वाद मिळकती संदर्भात वादी व त्यांचे भाऊ यांनी अधिक्षक,भूमि अभिलेख,जालना यांनी दि.२१.११.१९९९ रोजी अर्ज दाखल केला होता,तो नामंजूर केल्यामुळे त्याच्या विरुध्द् यांनी उप संचालक भूमि अभिलेख,औरंगाबाद यांनी अपिल क्र.५६०/२००१ दि.२९.०१.२००४ रोजी मंजूर केले. सदर आदेशान्वये गट नं.२२३ च्या अभिलेखात पुन्हा वादी व त्यांचे भाऊ यांच्या नावाचा अंमल मालक व कब्जेदार म्हणुन दि.०२.०८.२००४ रोजी फेर क्र.८६० प्रमाणे नोंदविण्यात आला होता.

२६. प्रतिवादी क्र.१ ते ४ अथवा मयत भरत कुंडलिकराव सुपारकर यांचा गट क्र.२२३ मधील वाद मिळकतीशी कुठलाही संबंध नसताना त्यांनी नि.दि.वा.क्र.१०९/२०१२ हे प्रकरण वादी व त्याच्या भावा विरुध्द् दाखल केले होते,ते सन–२००२ साली फेटाळण्यात आले. त्यानंतर तहसिलदार,जालना यांनी दि.२४.०४.२०१२ रोजी वादी अथवा त्यांचे भाऊ यांना कुठलीही पूर्व सूचना न देता सदर निर्णयाद्वारे पुन्हा भरत कुंडलिकराव सुपारकर यांच्या नावाचा

अंमल अभिलेखात घेण्याबाबत आदेशित केल्यामुळे त्यांचा नावाचा अंमल गट नं.२२३ च्या अभिलेखात फेरफार क्र.१९१४ नुसार करण्यात आला व वादी व त्यांच्या भावाच्या नावाचा अंमल गट नं.२२३ मधून वगळण्यात आला.

२७. वादी यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी वाद मिळकतीची कागदपत्रे बघितली असता फेरफार क्र.१९९४,२१९२ व २२९९ हे मंजूर केल्यामुळे त्यांनी वरील तीनही फेर विरुध्द् विलंब क्षमापणाच्या अर्जासह उप विभागीय अधिकारी, जालना यांच्याकडे आरओआर अपिल क्र.२०२१/आरओआर/सीआर–१३६ हे अपिल दाखल केले असता ते दि.०३.०३.२०२२ रोजी विलंब क्षमापित न करता अपिल फेटाळण्यात आले. त्यानंतर वादीने उप विभागीय अधिकारी,जालना यांच्या आदेशा विरुध्द् अप्पर जिल्हाधिकारी,जालना यांचे न्यायालयात दुसरे आरओआर अपिल क्र.२०२२/आरबी/अपिल/सीआर–४९ दाखल केले असता ते देखील दि.२३.०८.२०२२ रोजी फेटाळण्यात आले. त्यापूर्वी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी बेकायदेशीरपणे वाद मिळकत प्रतिवादी क्र.५ यांना नोंदणीकृत विक्री–पत्र क्र. ४८८४/२०२० दि.०५.१२.२०२० रोजी विक्री केल्यामुळे वादीला प्रस्तुतचा दावा दाखल करावा लागला.

२८. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार वादी यांनी अप्पर जिल्हाधिकारी, जालना यांचे दि.२३.०८.२०२२ रोजीच्या निर्णयाविरुध्द् मा.अप्पर आयुक्त,

औरंगाबाद येथे रिव्हीजन अर्ज क्र.४३७/२०२२ अन्वये अपिल दाखल केले होते,ते देखील दि.०५.०७.२०२३ रोजी निकाली निघालेले आहे. भू.सं.नि. क्र.६५/२००४ मध्ये दि.१५.१२.२००९ रोजी न्यायनिर्णय पारित झालेला असून त्याचे विरुध्द् वादीने कोणतेही अपिल दाखल केलेले नाही. तसेच वादी यांनी नि.दि.वा. क्र.१०९/२००० हा घोषणा व मनाई हुकूमाचा दावा दाखल केला होता,तो देखील दि.०७.०२.२००२ रोजी फेटाळण्यात आला. तसेच वादीने नि.दि.अ.क्र.३३/२००२ अपिल दाखल केले होते व त्यामध्ये दि. १४.०२.२००६ रोजी पुरशिष दाखल करुन अपिल काढून घेतले. वादी व त्यांचे भाऊ यांनी उप संचालक भूमि अभिलेख,औरंगाबाद येथे प्रकरण दाखल केले होते ते देखील निकाली निघालेले आहे. परंतु वाद मिळकतीशी संबंधीत प्रकरणे चालु असताना प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वारसाहक्काने भरत कुंडलिक सुपारकर यांच्या मृत्यूनंतर गट नं.२२३ मधील जमीन आर्थिक अडचणीमुळे प्रतिवादी क्र.५– गणपती रिरोल्स प्रा.लि. यांना विक्री–पत्र क्र.४८८४/२०२० दि.०५.१२.२०२० अन्वये विक्री केलेली आहे.

२९. एकंदरीत वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद आणि अभिलेखावरील दस्तऐवज यांचे अवलोकन केले असता वादी हे मौजे नागेवाडी,ता.जि.जालना येथील गट क्र.२२३,क्षेत्र.१२हे.८८आर पैकी ०३हे.६१आर या वाद मिळकतीचे

मालक व ताबेदार आहेत किंवा कसे,तसेच वाद चालु असताना वाद मिळकती संदर्भाने दावे/प्रतिदावे केलेले असून ते कोणाच्या हक्कात निकाली निघाले,तसेच प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी प्रतिवादी क्र.५–गणपती रिरोल्स प्रा.लि. यांना विक्री–पत्र क्र.४८८४/ २०२० दि.०५.१२.२०२० अन्वये विक्री केली हया बाबी सिध्द् करणे हा साक्षीपुराव्याचा भाग आहे.

३०. आजच्या टप्प्यावर अभिलेखानुसार मौजे नागेवाडी,ता.जि.जालना येथील गट क्र.२२३,क्षेत्र.१२हे.८८आर पैकी ०३हे.६१आर. ही जमीन प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी प्रतिवादी क्र.५ यांच्या हक्कात विक्री केलेली असल्याचे आणि वाद मिळकतीवर प्रतिवादी क्र.५ चा कायदेशीर हक्क असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. साहजिकच वादी यांनी प्रथमदर्शनी दावा आणि दाव्याचा समतोल त्यांच्या बाजुने असल्याचे सकृतदर्शनी अंशतः शाबीत केलेले आहे. वाद मिळकत ही या दाव्याचा विषय असून दावा प्रलंबीत आहे. वादीचे हक्कावर गदा येऊ नये म्हणुन प्रतिवादी क्र.५ च्या विरुध्द् वाद मिळकतीमध्ये त्रयस्त व्यक्तीचे हितसंबंध निर्माण करु नये,तसेचवाद मिळकतीची विल्हेवाट लावू नये म्हणुन दावा निर्णय होईपर्यंत प्रतिबंधात्मक अंतरिम आदेश पारित करणे संयुक्तीक ठरेल. वादीचा अर्ज अंशतः मंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही अपरिमीत नुकसान होण्याची शक्यता नाही. त्यामुळे वादीचा अर्ज अंशतः मंजूर करणे न्यायोचित ठरेल. करीता मुद्दा क्र.१ ते ३

वरील निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदविण्यात येऊन मुद्दा क्र.४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतात.

## **आदेश**

| | |
|---|---|
| १ | वादी यांचा नि.क्र.५ वरील अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |
| २ | प्रतिवादी क्र.५ यांनी मौजे नागेवाडी, ता.जि.जालना येथील गट क्र. २२३ क्षेत्र.१२हे.८८आर पैकी ०३हे.६१आर जमीन म्हणजे दाव्यात नमूद चतुःसिमेच्या आतील वाद मिळकतीचा अंतिम न्यायनिर्णय होईपर्यंत वाद मिळकत गहाण,तारण,बक्षिस अथवा अन्य प्रकारे हस्तांतरण करु नये,तसेच त्रयस्त व्यक्तीचे हितसंबंध निर्माण करु नये असा तुर्तातूर्त मनाई हुकूम पारीत करण्यात येत आहे. |
| ३ | खर्चाबाबत आदेश नाही. |
| ४ | आदेशाप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे. |

DILIP SHANKARRAO THORAT

Digitally signed by DILIP SHANKARRAO THORAT
Date: 2025.07.22 17:24:29 +0530

(दिलीप शं.थोरात)

दि.२१.०७.२०२५ दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)

जालना

**प्रमाणपत्र**

निवेदन करण्यात येते की,पी.डी.एफ.फाईल मधील शब्द न् शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :–शि.दि.देशमुख

न्यायालयाचे नाव :–दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),जालना

पी.डी.एफ.दिनांक :–दि.२२.०७.२०२५

लघुलेखक(म.)